महाराष्ट्र शासन

## पशुसंवर्धन विभाग,

# जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,भंडारा जिल्हा-भंडारा

(जिल्हा सामान्य रुगणालया जवळ,भंडारा )

### दरपत्रक सूचना

### द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतूक

मालाची खाजगी वाहतूक करणाऱ्या कंत्राटदारांना सूचित करण्यांत येते की भंडारा जिल्ह्यातील ८५ पशुवैद्यकीय संस्थांना माहे ०१ जुलै २०२५ ते ३० जून २०२६ या कालावधी साठी द्रवनत्र व विर्यमात्रा सुस्थितीत चांगले वाहनाद्वारे (टाटा ४०७ किंवा तत्सम) वाहतूक करण्याकरिता प्रति किमी दराने दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक कंत्राटदारांनी दि २६ जून २०२५ ते ०३ जुलै २०२५ (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन ) कार्यालयीन वेळेत आपली सिलबंद दरपत्रके या कार्यालयास सादर करावी.

सिलबंद दरपत्रके दि ०४ जुलै २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता समितीसमक्ष उघडण्यांत येतील.

(डॉ.विलास गाडगे)
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त
भंडारा

Scanned with OKEN Scanner

## जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त भंडारा जिल्हा भंडारा यांचे कार्यालय

**जा.क्र.:** जिपउआ/तां/जिकृरेकें/वाहतूक दरकरार/दसु/ 2028 /२०२५, भंडारा, दिनांक- २५ /०६/२०२५

**दरपत्रक सुचना**

खाजगी मालवाहतूक करणाऱ्या कंत्राटदारांना याद्वारे सूचित करण्यात येते कि भंडारा जिल्हा अंतर्गत व आवश्यकता भासल्यास अथवा राज्याबाहेरून लागणारे द्रवनत्र व विर्यमात्रा जिल्ह्यातील ८५ पशुवैद्यकीय संस्थांना पुरवठयासाठी द्रवनत्र पात्रांचे वाहतुकीकरीता **दिनांक ०१ जुलै २०२५ ते ३० जुन २०२६** या कालावधीमध्ये अंदाजे ३ मे. टन./ ३६ द्रवनत्र पात्रे वाहतुक क्षमता असलेल्या (मिनी ट्रक/वाहन ४०७) वाहनाचे नोंदणीकृत वाहतुक कंत्राटदाराकडुन प्रति किलोमीटर दराकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत. द्रवनत्र वाहतूक दरकरार संबंधी संपुर्ण सुचना, नियम व अटी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, भंडारा येथे सूचना फलकावर कार्यालयीन वेळेत व भंडारा जिल्ह्याचे संकेतस्थळ https://bhandara.gov.in तसेच पशुसंवर्धन विभागाचे अधिकृत संकेतस्थळ https://dahd.maharashtra.gov.in वर दिनांक २६ जुन २०२५ पासून पहावयास उपलब्ध असतील.

**द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतुकी करीता**

| अ. क्र. | जिल्हा अंतर्गत व जिल्हा बाहेर व परप्रांतात सुध्दा. | वाहनाची क्षमता | दरमहा होणारे अंदाजे अंतर कि.मि | १ वर्षात होणारी वाहतुक अंदाजे अंतर कि.मि. | सध्याचा दर प्रती कि.मी. रुपये | १ वर्षात होणारी अंदाजे मुल्य रूपये | पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | मिनी ट्रक/वाहन ४०७ भाड्याने घेणे | अंदाजे ३ मे. टन/ ३६ द्रवनत्र पात्रे | १५०० | १८००० | - | ६६६०००/- | १ जुलै २०२५ ते ३० जुन २०२६ |

**दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे वेळापत्रक**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | दरपत्रक सूचना प्रसिध्दी दिनांक: | २६.०६.२०२५ | सकाळी ११.०० वाजता |
| २. | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी दिनांक: | २६.०६.२०२५ ते ०३.०७.२०२५ | कार्यालयीन वेळेत |
| ३. | दरपत्रक समितीसमोर दरपत्रके उघडण्याचा दिनांक: | ०४.०७.२०२५ | दुपारी १२.०० वाजता |

(डॉ.विलास गाडगे)
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त
भंडारा

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र शासन
## जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, भंडारा
### द्रवनत्र वाहतूक दरकरार सन २०२५-२६ साठी नियम व अटी

१) द्रवनत्र वाहतूक दरकरार संबंधी संपुर्ण सुचना, नियम व अटी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, भंडारा येथे सूचना फलकावर कार्यालयीन वेळेत व भंडारा जिल्ह्याचे संकेतस्थळ https://bhandara.gov.in तसेच पशुसंवर्धन विभागाचे अधिकृत संकेतस्थळ https://dahd.maharashtra.gov.in वर दिनांक २६ जुन २०२५ पासून पहावयास उपलब्ध असतील.

२) सदर दरपत्रके दरपत्रक समिती समोर उघडण्यात येईल व समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

३) दरपत्रक सादर करणाऱ्या वाहतूक कंत्राटदाराने स्वतःचे पॅन कार्ड, आधार कार्ड यांची साक्षांकीत केलेली कागदपत्रे आणि आपल्या वाहनाची साक्षांकीत केलेली कागदपत्रे (उदा. वाहन नोंदणी प्रत, वाहन रस्ताकर पावती, वाहन वाहतूक फिटनेस सर्टिफिकेट, पीयुसी प्रमाणपत्र, इन्शुरन्स कॉपी, सामान वाहतूक परमीट, इत्यादी) तसेच सदर कामासंबंधी पूर्वानुभव असल्यास तसे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे व दरपत्रक समिती सभेच्या वेळी मुळ प्रती पडताळणी करीता सादर कराव्यात.

४) द्रवनत्र वाहतूक व पुरवठयाकरीता वापरण्यात येणारे वाहन हे सुस्थितीत असावे. तसेच वाहनास ऊन, वारा, पाऊस यापासून द्रवनत्रपात्रे सुरक्षित राहतील याकरीता हूड ठेवावे लागेल व वाहनास द्रवनत्रपात्रांखाली रबर मॅटींग लावावे लागेल. तसेच दरपत्रक उघडण्याच्या दिवशी समीतीसमोर तपासणीसाठी वाहन ठेवावे. समिती यावर अंतीम निर्णय घेईल.

५) द्रवनत्रपात्र वाहतूकीच्या वेळेस गाडीचा वेग दरताशी ३० ते ३५ किमी. पेक्षा जास्त राहू नये. जास्त वेगाने गाडी नेल्यास होणा-या नुकसानीच्या भरपाईची जबाबदारी वाहतूक कंत्राटदारावर राहील.

६) वाहनामध्ये चालकाचे जवळ दोन व्यक्ती बसण्याची व्यवस्था असावी व खाली रबर मॅटींग असावे. वाहतुकीच्या वेळेस कार्यालयाचे एक किंवा दोन प्रतिनिधी सोबत राहतील.

७) वाहन वाहतुकीच्या सेवेत असतांना वाहनाची हालचाल वाहनासोबत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या आदेशाप्रमाणे करावी लागेल. वाहनात खाजगी सामान किंवा इतर प्रवाशांची वाहतूक करता येणार नाही. तसेच वाहन चालक यांची वर्तणूक चांगली असावी. दारू पिऊन वाहन चालवू नये. तसे केल्यास मंजूर करार खंडीत करण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखांना राहतील.

८) वाहनात द्रवनत्रपात्र चढविणे, उतरविणे व उपकेंद्रांपर्यंत पोहचविण्यासाठी कंत्राटदाराला मदत करावी लागेल. त्याकरीता वेगळा दर आकारता येणार नाही. तसेच रात्रीच्या मुक्कामाचा वेगळा दर आकारता येणार नाही.

९) द्रवनत्र वाहतूकीचे मार्गावर कृत्रिम रेतन उपकेंद्राचे शासकीय सामान असेल तर ते विनामुल्य वाहतूक करावे लागेल व ते त्याला बंधनकारक राहील.

१०) द्रवनत्र वाहतूकीच्या वेळेस पथकर/ टोलटॅक्स व इतर शासकीय सर्व टॅक्स वाहतूक कंत्राटदारास द्यावा लागेल.

११) आवश्यकता भासल्यास ज्या कंपनीसोबत द्रवनत्र खरेदीचा भावबंध करार होईल तेथून द्रवनत्र आणावा लागेल. इतर राज्यातून द्रवनत्र व जनावरे आणण्याकरीता आर.टी.ओ.चे लायसन्स/ परमीट प्राप्त करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच अत्यावश्यक आणीबाणीच्या परिस्थितीत द्रवनत्र महाराष्ट्र किंवा इतर राज्यातील अन्य कंपनीकडून आणावा लागेल.

१२) द्रवनत्र पुरवठयाकरीता ज्या ज्या वेळेस हे कार्यालय वाहनाची मागणी करेल; त्या त्या वेळेस कंत्राटदारास वाहन पुरविणे बंधनकारक राहील. जर नमुद वेळेत वाहन पुरवू शकले नाही, तर हे कार्यालय बाजारात उपलब्ध असलेल्या

Scanned with OKEN Scanner

दराने वाहन मागवून द्रवनत्र पुरवठा करेल व दरामधील फरक वाहतूक कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येईल. वाहन पुरविण्यास वारंवार खोळंबा निर्माण झाल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१३) द्रवनत्र पुरवठा हा प्रत्येक मार्गावरील उपकेंद्रांना वेळेवर होण्याचे दृष्टीने वाहन या कार्यालयात सकाळी सुचीत केलेल्या वेळेवर आणावे लागेल. वाहनाचे मिटर चालू असणे आवश्यक आहे.काही कारणास्तव मिटर बंद झाले तर त्वरीत दुरुस्त करुन घ्यावे लागेल व त्या कालावधीपर्यंत प्रत्येक मार्गाचे असलेले ठरावीक कमीतकमी अंतराचे देयक मंजूर करण्यात येईल.

१४) ०१ जुलै २०२५ ते ३० जून २०२६ या कालावधीत डिझेल इंधन इत्यादीची भाववाढ झाली तरी मंजूर दरात कोणतीही दरवाढ मिळणार नाही.

१५) ज्या वाहतूकदाराचे दरपत्रक मंजूर होईल त्याला मंजूरी आदेश प्राप्त झाल्यानंतर त्या दिवसापासुन ०७ दिवसाच्या आत पूर्ण वर्षाच्या वाहतूकीच्या संभाव्य देय रकमेच्या ०३% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून या कार्यालयात भरावी लागेल व रितसर रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.

१६) दरपत्रक मंजूर/नामंजूर करण्याबाबतचा अंतीम निर्णय तसेच या संदर्भातील कोणत्याही अडचणीबाबतचा अंतीम निर्णय प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, नागपूर विभाग नागपूर यांचा राहील.

१७) वाहतूकीच्या देयकाची रक्कम देयक सादर केल्यापासुन शक्यतो ४५ दिवसांचे आत अदा करण्यात येईल.

१८) आयकर नियम १९६१ सेक्शन १८४- सी अन्वये कंत्राटदाराचे दर महिन्याचे देयकातून २.२% आयकर रक्कम कपात केली जाईल किंवा आयकर नियमाप्रमाणे वेळोवेळी होणा-या बदलानुसार कपात करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र शासनाकडून विक्रीकर कायद्याअंतर्गत नवीन करप्रणाली अंमलात आल्यास त्याबाबतचा कर आपल्याकडून आकारण्यात येईल.

१९) कंत्राटदारास कोणत्याही प्रकारची आगावू रक्कम अथवा अग्रिम देण्यात येणार नाही. तसेच कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारची अट कार्यालयावर लादता येणार नाही.

२०) कार्यालयाच्या लेखी आदेशान्वये द्रवनत्र पुरवठा करणारे वाहन द्रवनत्र पुरवठा कामाव्यतीरीक्त कार्यालयाचे अन्य कामाकरीता जिल्हयाबाहेर व राज्याबाहेर न्यायचे झाल्यास मंजूर दरपत्रकानुसार नेण्यात येईल. रात्रीच्या मुक्कामाचा दर वेगळा देण्यात येणार नाही.

२१) कंत्राटदारास मान्य दराने द्रवनत्र व वीर्यकांडया वाहतुक करण्याव्यतिरिक्त पशुसंवर्धन खात्याचे लसमात्रा, वैरणबियाणे, औषधी व विभागीय व्यवस्थापक अतिशीत रेत प्रयोगशाळा नागपूर या कार्यालयातील द्रवनत्र व वीर्यकांडया व इतर आवश्यक शासकीय साधनसामुग्रीची वाहतुक करावी लागेल.

२२) दि. ३० जून २०२६ नंतर अत्यावश्यक प्रसंगी पुढील निविदेला काही अडचणींमुळे मंजुरी प्राप्त झाली नाही तर पुढील तीन महिने आधीच्याच दराने वाहतूक करावी लागेल.

२३) दरपत्रक सादर करताना नियम व अटी पूर्ण वाचून व त्या समजून, त्या पूर्ण मान्य आहेत म्हणून त्यावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

२४) शा.नि. वि.वि. संकिर्ण १०१०/प्र.क्र.६८/ कोशा/ प्र.५ दि. १८ एप्रिल २०११ च्या निर्देशानुसार पुरवठा देयकाची रक्कम ECS/ NEFT/ CMP प्रणालीद्वारे अदा करण्यात येईल. करीता पुरवठाधारकांनी बँक खाते क्र., आधार क्र. आणि निरस्त धनादेश सादर करावे लागेल.

२५) या संबंधात सर्व न्यायालयीन दावे भंडारा न्यायालयाच्या अंतर्गत असतील.

Scanned with OKEN Scanner

सदरील कार्यवाहीला समितीकडून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.,

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,
भंडारा तथा अध्यक्ष

जिल्हा कोषागार अधिकारी, लेखा व
कोषागारे कार्यालय, भंडारा. तथा सदस्य

सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन कार्यालय
जि.प.उ.आ. , भंडारा. तथा सदस्य

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
भंडारा. तथा सदस्य

सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन जिल्हा कृत्रिम
रेतन केंन्द्र, भंडारा. तथा सदस्य सचिव

Scanned with OKEN Scanner